निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : १९१ वा.
रविवार - १४ सप्टेंबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## संक्षिप्त

### फुलंब्रीत बनावट अकृषिक परवाने रॅकेट उघडकीस!

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री (प्रतिनिधी )** महसुली अभिलेखात फेरफार करून बनावट अकृषिक परवाने तयार केल्याचा मोठा प्रकार उघड झाला आहे. या परवान्यांच्या आधारे जमिनींचे खरेदीखत व नोंदणीकृत दस्त करण्यात आल्याचे निष्पन्न झाले असून, मंडळ अधिकारी यांच्या फिर्यादीवरून सुनील भिका बिरारी (अंबिका प्लॉटिंग सेंटर तर्फे भागीदार, रा. फुलंब्री) व शेख तय्यब फकीरा पटेल (रा. नायगाव) यांच्यावर फुलंब्री पोलिस ठाण्यात शुक्रवार दि. १२ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल झाला आहे.अजय गंगावणे यांच्या अपीलवरून घोटाळा उघड फुलंब्रीतील रहिवासी अजय मधुकर गंगावणे यांनी महसुली फेरफार रद्द करण्यासाठी दाखल केलेल्या अपीलप्रकरणांच्या सुनावणीत या बनावटगिरीचा पर्दाफाश झाला. उपविभागीय अधिकारी पैठण-फुलंब्री न्यायालयाने १९ ऑगस्ट २०२५ रोजी दिलेल्या आदेशांनंतर महसुल विभागाने सखोल तपास सुरू केला असता परवाने बनावट असल्याचे निष्पन्न झाले.

**बनावट परवाने कसे तयार झाले?**

गट क्र. २३ : आदेश दि. १७/०९/२०१९ - अर्जदार सुनील भिका बिरारी व गट क्र. १८ : आदेश दि. ०८/१०/२०१९ - अर्जदार शेख तय्यब पटेल यांच्या परवान्यांवर तत्कालीन उपविभागीय अधिकारी भाऊसाहेब जाधव यांची सही असल्याचे दाखविण्यात आले. मात्र ते त्या वेळी पदावर नसल्यामुळे सही बनावट असल्याचे स्पष्ट झाले. नगररचना विभागानेही अशा झोन दाखल्यांचा अभिलेख नसल्याचे पत्राद्वारे कळविले.

**बनावट परवान्यांचा वापर करून व्यवहार**

गट क्र. २३ - दस्त क्र. ८४७/२०२३ (दि. २७/०४/२०२३) व २५५५/२०२३ (दि. २९/१२/२०२३) व गट क्र. १८ - दस्त क्र. ११७/२०२४ (दि. १५/०१/२०२४) बनावट आदेश दाखवून संबंधितांनी खरेदीखत नोंदवून महसुली अभिलेखात फेरफार केला.

**पोलिसांत दाखल गुन्हा**

फिर्यादी मंडळ अधिकारी अप्पासाहेब गोराडे यांच्या निवेदनावरून पोलिसांनी आरोपींवर खालील कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे -भा.दं.वि. कलम ४२०, ४६८, ४७१, ४६५ नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ (ब), (क)

**पुढील चौकशीची दिशा**

या प्रकरणामागे मोठे रॅकेट असण्याची शक्यता व्यक्त होत असून, पोलिसांनी सखोल तपास सुरू केला आहे. महसुल विभाग, नगररचना विभाग व पोलिस प्रशासन यांच्या संयुक्त कारवाईनंतर आणखी नावे समोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# आदिवासींच्या जीवनात येत्या ३ वर्षांत आमुलाग्र परिवर्तन घडेल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**यवतमाळ / प्रतिनिधी/** आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र शासनाने महत्वाच्या योजना हाती घेतल्या असून, त्यासाठी देशात १ लक्ष कोटी रू. निधी उपलब्ध करून दिला आहे. महाराष्ट्रातही आदिवासी समाजासाठी घरे, रस्ते, वीज, पाणी, वसतिगृह व रोजगार अशा सुविधांसाठी योजना-उपक्रम राबविण्यात येत असून, पुढील ३ वर्षांत आदिवासींच्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन घडेल, असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते यवतमाळ येथे एकूण ३३५ कोटी रु.च्या विविध विकास कामांचे लोकार्पण, भूमिपूजन तसेच विविध उपक्रमांचा शुभारंभ झाला, त्यावेळी ते बोलत होते. मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, खासदार संजय देशमुख, आमदार राजू तोडसाम, आमदार किसनराव वानखेडे, सईताई डहाके, संजय डेरकर, श्याम कोडे, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी विकास मीना आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आदिवासी समाजासाठी ५४ हजार कुटुंबांना घरे, नळांद्वारे पाणी, उपचारासाठी दवाखाने, वसतिगृह अशा अनेक सुविधा वेगाने पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आदिवासी विकासासाठी ज्या योजना व उपक्रम आणले, तशी भरीव कामगिरी त्यापूर्वी झालेली नाही. आदी कर्मयोगी योजनेतून जिल्ह्यातील ३६६ गावांची निवड झाली आहे. योजनेतून राज्यातील ३० लाख युवकांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे. त्यातून स्थानिक नेतृत्वाचा विकास होणार आहे.

शासनाने अनुकंपा तत्वावरील सेवाप्रवेशाचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला. त्यात पंधरा हजार युवकांना अनुकंपातून नियुक्ती देण्यात येणार आहे. सुमारे ३५ मे. वॅट सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाल्याने शेतीला १२ तास दिवसा वीज मिळत आहे. शेतकऱ्यांना दिवसा दहा तास मोफत वीज देण्याचेही नियोजन आहे. यवतमाळ जिल्ह्यातील नागरिकांसाठी आवश्यक सुविधांच्या अनुषंगाने निधीची कमतरता पडू देणार नाही. पावसाने जिल्ह्यात शेती, घरे, पशुधन यांचे नुकसान झाले. त्याची भरपाईही लवकरात लवकर अदा केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**विविध विकासकामांचा शुभारंभ**



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते यवतमाळ येथे आज एकूण ३३५ कोटी रु.च्या विविध विकास कामांचे लोकार्पण भूमिपूजन तसेच उपक्रमांचा शुभारंभ झाला. त्यात आदिवासी विकास विभागाच्या पाच वसतिगृहे व इतर कामे मिळून ५१ कोटी रुपये किंमतीच्या कामांचा समावेश आहे. तसेच बांधकाम विभागाची ६७ कोटींची कामे मुख्यमंत्री सौर ऊर्जा वाहिनी योजनेत ११ सौर ऊर्जा प्रकल्प व इतर कामांसाठी १५८ कोटी व इतर विविध विभागांच्या ५९ कोटी रुपयांच्या कामांचा समावेश आहे.

जिल्हा प्रशासनातर्फे मिशन कॉम्पिटिटिव्ह एक्सलन्स रोड मेंटेनन्स डिजीटल प्लेटफॉर्म ई-मित्र चॅटबॉट मिशन उभारी समग्र डॅशबोर्ड प्रोजेक्ट सॅन्ड मॅप शासन आपल्या मोबाईलवर सी. आर. एफ. न्ड वार रुप डॅशबोर्ड यासह इतर विविध नाविण्यपूर्ण उपक्रमांचा शुभारंभ मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते झाला. यातील ई-मित्र चॅटबॉटद्वारे ३४ योजनांची माहिती केवळ २ क्लिकवर नागरिकांना उपलब्ध होणार आहे. 'उभारी' पद्वारे गेल्या पाच वर्षातील ७७० आत्महत्याग्रस्त कुटुंबांचा ऑनलाईन सर्वे करण्यात आला. या कुटुंबांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी उभारी हे प उपयुक्त ठरणार आहे. जिल्हा डॅश बोर्डच्या माध्यमातून विविध शासकीय योजनांचा रिअल टाइम आढावा आणि मॉनिटरिंग करणे सोपे होणार असून कमी कालावधीत योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्यास मदत होणार आहे. धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाअंतर्गत अनुसूचित जमातीच्या सर्वांगीण विकासासाठी १७ विभागांच्या २५ योजना-उपक्रमांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्याला जोडून आदि कर्मयोगी अभियान हे विकेंद्रित आदिवासी नेतृत्व व आदर्श प्रशासन निर्माण करण्यासाठीची चळवळ आहे. जिल्ह्यातील ३६६ गावांचा त्यात समावेश असून, आदिवासी बांधवांना त्याचा लाभ होईल. प्रधानमंत्री किसान सन्मान व नमो शेतकरी महासन्मान निधी योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असून २ लाख ९४ हजार शेतकऱ्यांना योजनेचा लाभ दिला जात आहे.जिल्ह्यात अनुकंपा तत्वावर २७ उमेदवारांना सेवेत घेण्यात आले. त्यातील ४ उमेदवारांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.विविध विभागांतर्फे योजनांची माहिती देणारे कक्षही उभारण्यात आले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

## पैठण रोटरी क्लबचा आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या थाटात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**पिंपळवाडी/ प्रतिनिधि/** पैठण रोटरी क्लबच्या वतीने एमआयडीसी येथील सेंट पॉल इंग्लिश स्कूल सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमात तालुक्यातील विविध शाळेतील शिक्षकांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.यावेळी पिंपळवाडी (पिराची ) येथील पोलीस पाटील अशोक चाबुकस्वार यांनी आजवर केलेल्या सामाजिक,शैक्षणिक, वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल रोटरी क्लबच्या वतीने त्यांना सन्मानित करण्यात आले.पैठण एमआयडीसी परिसरातील सेंट पॉल इंग्लिश स्कूलच्या सभागृहात रोटरी क्लबच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यात तालुक्यातील विविध शाळेतील शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.तसेच यावेळी पिंपळवाडी ( पि ) येथील पोलीस पाटील अशोक चाबुकस्वार यांनी विविध क्षेत्रात आजवर केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल उपस्थितांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष गोपाल जगतात,रेव्ह.फादर डॉ. व्हलेरियन फर्नांडिस क्लब ट्रेनर,सचिव पवनकुमार लोहिया तसेच एमआयडीसी पोलिस ठाण्याचे सपोनी ईश्वर जगदाळे, पंचायत समिती शिक्षण अधिकारी केदार,आश्रम शाळेचे संस्थापक डॉ.झारगड, सखू झारगड,सामाजिक कार्यकर्ते सतीश बोर्डे, ब्रम्हाक्षस सर,पोलीस पाटील कडुबाळ चाबुकस्वार, रामकिसन,पत्रकार गजानन आवारे यांच्या सह पिंपळवाडी सर्कल मधील गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.यापूर्वीही अशोक चाबुकस्वार यांनी विविध क्षेत्रात आजवर दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल अनेक संस्थाकडून दहा ते बारा पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.



**१८ शिक्षक आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित.**

समशेर महम्मद पठाण,सहशिक्षक (जि. प.प्रशाला पैठण) कल्याण सोनवणे(भगवान बाबा विद्यालय केकत जळगाव किरण गाढेकर (जि.प.उच्च प्राथमिक शाळा धनगाव ), बालाजी नलभे (कौशल्या विद्यामंदिर पाटेगाव), शिवाजी कुसारे( कन्या प्रशाला पैठण ),रामदास रामवत( आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूल),मीरा पाटील ( जि.उच्च प्राथमिक शाळा इसरवाडी),जकी अन्सारी (अब्दुल कादर उर्दु हायस्कूल ),बाळू झारगड( पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आश्रम शाळा पिंपळवाडी) यांच्यासह ईतर आठ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले.

## राष्ट्रीय लोक अदालतीत अनेक प्रकरणे निकाली

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड (प्रतिनिधी)** राज्यात शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीला मोठे यश मिळाले आहे. दिवसभरात अनेक प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने आणि तडजोडीने निकाली काढण्यात आली. या उपक्रमामुळे न्यायालयावरील ताण कमी होण्यास मदत झाली असून, अनेक वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या पक्षकारांना मोठा दिलासा मिळाला आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे दोन्ही बाजूंच्या पक्षकारांनी समाधान व्यक्त केले.महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने राज्यातील सर्व जिल्हा व तालुका न्यायालयांमध्ये या लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, कौटुंबिक वाद, धनादेश न वटल्याची प्रकरणे, बँकेची कर्ज वसुली आणि वीज बिलांशी



संबंधित हजारो प्रकरणे ठेवण्यात आली होती. सकाळपासूनच न्यायालयांमध्ये पक्षकार आणि वकिलांची गर्दी दिसून येत होती. एकंदरीत, या राष्ट्रीय लोक अदालतीने हजारो लोकांना जलद आणि सुलभ न्याय मिळवून दिला असून, 'न्याय आपल्या दारी' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. यामुळे न्यायव्यवस्थेवरील लोकांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.लोकअदालतीसाठी अंबड न्यायालयात एकूण ५ पॅनलची निर्मिती करण्यात आली होती.१) पॅनेलप्रमुख म्हणून कार्यरत न्या.श्री.गायधने साहेब जिल्हा न्यायाधीश तथा अति सत्र न्यायाधीश, अंबड सदस्य म्हणून ड.धबडकर २) पॅनेलप्रमुख म्हणून कार्यरत न्या श्री व्हि सी गवई दिवाणी न्या व स्तर.अंबड सदस्य म्हणून ड.गिरी ३) पॅनेलप्रमुख म्हणून कार्यरत न्या.श्रीमती.एस.एस जैन मॅडम,दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क स्वर,अंबड पॅनेल सदस्य म्हणून ड, एम जी.खेडकर ४) पॅनल न्या.श्रीमती.एस एच.राठी.याचसाहेब,तिसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, अंबड,सदस्य म्हणून ड. आर डी पावसे ५) पॅनेलप्रमुख म्हणून कार्यरत न्या. श्रीमती एस.एस परिहार मॅडम, पॅनेल सदस्य म्हणून ड. के एस साबळे, यांच्या सह न्यायालयातील सर्व कर्मचारी,वकिलांनी व पोलीस प्रशासनाने आणि तालुका विधि सेवा प्राधिकरण सदस्यांनी कामकाज पाहिले.

## श्री.संत ज्ञानेश्वरविद्या मंदिरात पार पडले एड्स जनजागृती शिबीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड /उदय कुलकर्णी/**श्री संत ज्ञानेश्वर विद्या मंदिर कन्नड येथे ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने एड्स जनजागृती शिबिर घेण्यात आले. आजच्या युगात एड्स सारख्या रोगाबाबत योग्य माहिती, जागरूकता आणि प्रतिबंधक उपाय यांचे महत्त्व लक्षात घेऊन या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.कन्नड ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अनिरुद्ध गायकवाड व डॉ. प्रवीण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली श्री संजय सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना एड्सची कारणे, लक्षणे, प्रतिबंधक उपाय आणि समाजातील गैरसमज याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना निरोगी जीवनशैलीचा अंगीकार करण्याचे आवाहन केले.या वेळी रुग्णालय प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी श्री शशिकांत गांगुर्डे, मुख्याध्यापक प्रकाश जिरेमाळी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने शिबिरात सहभाग घेतला आणि आपले प्रश्न विचारून शंका दूर केल्या.या शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये एड्सबाबतची अंधश्रद्धा, भीती व गैरसमज दूर होऊन योग्य माहिती रुजण्यास मदत झाली. समाजाच्या आरोग्यदायी घडणीसाठी अशा




जनजागृती कार्यक्रमांची मोठी गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार,आधार आणि अमर्याद ज्ञान देणारा व्यक्ती म्हणजे शिक्षक-अर्चनाताई आडसकर

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/ रमेश इतापे /** प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी शारदा स्टार टीचर पुरस्कार २०२५ पुरस्काराचे वितरण शाळेच्या मार्गदर्शिका श्रीमती अर्चनाताई आडसकर यांच्या हस्ते करण्यात आले.यावर्षी पुरस्काराचे मानकरी शाळेचे ज्येष्ठ शिक्षक सुरज सनी, श्री रमीज एच व पूजा आकुसकर हे ठरले तर उत्कृष्ट समन्वयक म्हणून जयसिंग काळे सर यांची निवड झाली.

सर्व प्रथम निवड झालेल्या आदर्श शिक्षकांचा सन्मान अर्चनाताई आडसकर यांच्या हस्ते करण्यात आला शाल,श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन त्यांना गौरवण्यात आले. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना श्रीमती अर्चनाताई आडसकर यांनी सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे कौतुक केले. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की शारदा इंग्लिश स्कूल केज ही शाळा छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस संस्थेची एक उत्कृष्ट शाखा असून शाळेच्या जडणघडणीमध्ये संस्थेबरोबरच शिक्षकांचाही मोलाचा वाटा आहे. यामुळे प्रतिवर्षी आपण उत्कृष्ट शिक्षकांचा शारदा स्टार टीचर पुरस्कार देऊन गौरव करतो. शाळेमध्ये कार्यरत शिक्षकांमध्ये इतर राज्यातील शिक्षकांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांचीही मोलाचे योगदान जडणघडणीमध्ये असल्याचे आवर्जून उल्लेख त्यांनी केला. शिक्षक हा विद्यार्थ्यांचा जीवनाला आकार देणारा,आधार देणारा आणि प्रचंड ज्ञान देणारा देणारा व्यक्ती असतो. त्यामुळे त्याचा मान सन्मान आदर समाजात केला जातो.

शिक्षकांची ही जबाबदारी आहे की त्याप्रमाणे आपले आचरण असावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



शाळेचे प्राचार्य मिश्रा एस एम यांनी बोलताना सांगितले की शाळेमध्ये शिक्षकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. सर्व शिक्षक समर्पित भाव असलेले असून विद्यार्थ्यांप्रती प्रामाणिकपणे कार्यरत आहेत.

आमच्या पुढे स्टार टीचर म्हणून निवड कुणाची करावी हा मोठा प्रश्न होता परंतु सर्व शिक्षकांनी एकत्रित येत प्रतिनिधिक स्वरूपामध्ये वरील शिक्षकांना पुरस्कार द्यावा असा आग्रह धरला. प्रत्येकच शिक्षक आदर्श असल्याने पुरस्कार सर्वांनाच मिळाला असे समजून घ्यावे असे मत मांडले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन श्री प्रशांत बाबर सर यांनी केले तर समारोप श्रीमती वर्षा दिक्षत यांनी केला.

# ओबीसी आरक्षणासाठी जीव दिला, भरत कराडच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री मदत देतील का

राज्यातील ओबीसी आणि मराठा आरक्षणाचा मुद्दा गंभीर बनला असून मराठा समाजाच्या काही युवकांनी आत्महत्येसारखए टोकाचे पाऊल उचलले होते. त्यानंतर, आता ओबीसी आरक्षण वाचविण्यासाठी लातूर जिल्ह्यातील वांगदरी येथील एका तरुणाने आत्महत्या केल्याची घटना समोर आली होती. लातूरच्या वांगदरी येथील भरत कराड याने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले.

त्यानंतर, ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांच्यासह आमदार धनंजय मुंडे यांनीही वागंदरी गावी जाऊन पीडित कुटुंबीयांचे सांत्वन केल होते. आता, भरत कराड याच्या कुटुंबीयाला राज्य सरकारने २५ लाखांची मदत करावी तसेच त्याच्या कुटुंबातील व्यक्तीला पात्रतेप्रमाणे शासकीय नोकरी द्यावी अशी मागणी माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी एका पत्राद्वारे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना केली आहे.धनंजय मुंडे यांनी आपल्या सोशल मिडिया अकाऊंटवरुन याबाबतचे पत्र शेअर केले असून दोन दिवसांपूर्वी मंत्री छगन भुजबळ यांच्यासोबत त्यांनी कराड कुटुंबीयांची भेट घेतली होती आणि त्या कुटुंबाला संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन देखील दिले होते.

त्यानंतर आज धनंजय मुंडे यांनी पत्राद्वारे ही मागणी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ही मागणी केली. दरम्यान, स्व. भरत कराड यांच्या पश्चात कुटुंबात आई-वडील, पत्नी, भाऊ, तीन मुली व एक मुलगा असा मोठा परिवार असून त्यांच्या या बलिदानाने उघड्यावर पडलेल्या या कुटुंबाला राज्य सरकार न्याय देईल, असा विश्वासही धनंजय मुंडेंनी व्यक्त केला आहे.

ओबीसी आरक्षण संपुष्टात येईल या नैराश्यातून वांगदरी ता. रेणापूर, जि. लातूर येथील स्व. भरत कराड (वय ३५) या तरुणाने आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली होती. त्यानंतर, भरत कराड यांच्या कुटुंबाला तातडीची मदत म्हणून आपल्या नाथ प्रतिष्ठानच्यावतीने एक लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली होती. आरक्षण प्रश्नी सरकार सजग असून, कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही, यासाठी संविधानाच्या चौकटीत राहून लढा लढला जाईल, मात्र आरक्षणाच्या प्रश्नावर कुणीही आत्महत्या करण्यासारखे टोकाचे पाऊल उचलू नये, असे कळकळीचे आवाहनही मुंडेंनी केले होते.दरम्यान, लातूर जिल्ह्यातील वांगदरी येथील रिक्षाचालक भरत कराड यांनी मांजरा नदीपात्रात उडी घेऊन आपले जीवन संपवले. यावेळी, ओबीसी आरक्षण बचाव, ओबीसींना आरक्षण मिळालं पाहिजे, अशी घोषणाबाजीही त्यांनी केली होती. विशेष म्हणजे ओबीसींच्या प्रत्येक आंदोलनात त्यांचा सहभाग असल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात आले.मात्र मुख्यमंत्री खरच मदत देतील का हे मात्र येणाऱ्या काळात वाट पाहावी लागेल.

# भगवान बुद्ध शोपीस नाहीत – त्यांचा सन्मान करा, कचराकुंडीपासून वाचवा!

आजच्या समाजात एक वेदनादायी वास्तव दिसून येते. या बदलत्या जीवनशैलीत घराची सजावट, सौंदर्यवर्धन आणि दिखाऊपणा याला मोठे महत्त्व दिले जात आहे. घर-सजावटीसाठी बुद्धांच्या मूर्ती मोठ्या उत्साहाने विकत घेतल्या जातात. या सजावटीत अनेकदा भगवान बुद्धांच्या मूर्तींचा समावेश केला जातो. घराच्या ड्रॉइंगरूममध्ये, बागेत किंवा ऑफिस टेबलावर बुद्धाची मूर्ती ठेवली की शांती आणि सकारात्मकता मिळेल, असे मानले जाते. दुर्दैवाने या मूर्तींच्या खऱ्या अर्थाचा, त्यांच्या आध्यात्मिक संदेशाचा विचार अनेकदा होत नाही. शोपीस म्हणून घेतलेल्या या मूर्ती कालांतराने तुटल्या, मळकटल्या किंवा नकोशा झाल्या की त्या सरळ कचराकुंडीत टाकल्या जातात. अशा मूर्ती कचराकुंडीत टाकणे म्हणजे संस्कृतीहीनतेचे लक्षणच म्हणावे लागेल. हे दृश्य अत्यंत वेदनादायी आणि अपमानकारक आहे. हा केवळ मूर्तींचा नव्हे, तर बुद्धांच्या शिकवणीचा अपमान आहे.

भगवान बुद्ध हे केवळ बौद्ध धर्माचे प्रवर्तक नव्हते, तर ते संपूर्ण मानवजातीसाठी शांततेचा मार्ग दाखवणारे महापुरुष होते. भगवान बुद्ध हे शांततेचे, करुणेचे आणि समतेचे जागतिक प्रतीक असुन त्यांनी करुणा, दया, समता, मैत्री आणि अहिंसा यांचे तत्त्वज्ञान मांडले. त्यांच्या शिकवणींनी केवळ भारतालाच नाही, तर जगभरातील लाखो-कोट्यवधी लोकांना जीवनाचा खरा मार्ग दाखवला. त्यांची प्रतिमा ही केवळ सजावटीची वस्तू नसून जीवनातील विवेक व मूल्यांची आठवण करून देणारे प्रतीक आहे. अशा थोर व्यक्तिमत्त्वाच्या मूर्तीला 'सजावटीचा शोपीस' मानणे आणि त्याचा अनादर करणे ही आपली सांस्कृतिक अधोगतीच म्हणावी लागेल. हे मान्य करावे लागेल की अंधश्रद्धा, फेंगशुई किंवा 'लक' यासाठी मूर्ती ठेवली जाते. परंतु खरेतर मूर्ती ठेवण्यामागे श्रद्धा आणि आदर असणे आवश्यक आहे. शोपीस म्हणून मूर्ती ठेवून तिचा अपमान करणे म्हणजे भगवान बुद्धांच्या विचारांचा, तत्त्वज्ञानाचा आणि इतिहासाचा अपमान होय.



समाजाने या बाबतीत संवेदनशील होणे आवश्यक आहे. मूर्ती तुटली तर ती योग्य धार्मिक संस्थांना सुपूर्द करावी किंवा सन्मानपूर्वक विसर्जित करावी. माध्यमे, शाळा व सामाजिक संघटनांनीही जनजागृती करणे गरजेचे आहे. बुद्धांचा खरा सन्मान मूर्ती ठेवण्यात नसून त्यांच्या करुणा, दया आणि विवेक या शिकवणी आचरणात आणण्यात आहे. म्हणूनच लक्षात ठेवू या. भगवान बुद्ध शोपीस नाहीत आणि त्यांच्या प्रतिमा कचराकुंडीकरिता तर अजिबातच नव्हेत. त्यांच्या प्रतिमेचा सन्मान राखणे हेच आपल्या संस्कृतीचे खरे लक्षण आहे. तर चला, बुद्धांना कचराकुंडीपासून वाचवू या; आणि त्यांच्या शिकवणीला आपल्या हृदयात स्थान देऊ या.

**-प्रवीण बागडे**
**नागपुर**

# नारी शक्तीचा अपमान करणाऱ्या काँग्रेस च्या नेत्याचा जाहीर निषेध !- संगीताताई गोरंटयाल

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना (प्रतिनिधी)**
काँग्रेस पक्षाच्या नेत्यांकडून पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या आईविषयी -ख तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तयार केलेला व्हिडीओ द्वारे अपमानास्पद अशोभनीय चित्रण तयार करून नारी शक्तीचा अपमान करणाऱ्या काँग्रेस च्या नेत्यांचा आम्ही भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा जिल्हा जालना याचा जाहीर निषेध करतो व भविष्यात मातृशक्ती विषयी प्रसार माध्यमांसमोर अपमानास्पद वक्तव्य न थांबवल्यास भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा याचे चोख प्रतिउत्तर देतील असे आज दि.१३ संप्टेंबर २०२५ रोजी भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालयासमोर झालेल्या निषेध आंदोलनाच्या वेळी बोलताना संगीताताई गोरंटयाल यांनी सांगितले.यावेळी भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा महानगर जिल्हाध्यक्षा शुभांगीताई देशपांडे यांनी बोलतांना सांगितले की, काँग्रेस ची संस्कृती हि नारी शक्तीचा अपमान करणारी असून त्यांच्या या कृत्यामुळे त्यांची हि विकृती दिसून आलेली आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी हे मातृशक्ती, नारीशक्तीचा कायमच सन्मान करत आलेले आहे. त्यांच्या आई चा राजकारणाशी कुठलाही संबंध नाही, त्यांनी धुणीभांडी करून आपल्या मुलाला सुसंकृत बनविले त्याला राष्ट्रभक्ती चे धडे दिले व नरेंद्रभाई सारखे राष्ट्रभक्त कणखर पंतप्रधान या देशाला दिले अशा नेत्याच्या आई विषयी अपमानास्पद वक्तव्य करून काँग्रेसने आपली मातृशक्ती व नारी शक्ती विषयी असलेली आत्मीयता आपल्या या वक्तव्यातून या देशातील नारी शक्तीला दाखवून दिली आहे. देशातील नारी शक्ती त्यांच्या असल्या विकृत कृतीचा जाहीर निषेध करून आगामी काळात याचे प्रतिउत्तर देतील व काँग्रेसला याचे परिणाम भोगावे लागतील असेही त्यांनी सांगितले.




यावेळी जालना ग्रामीण जिल्हाध्यक्षा संध्याताई देठे, जालना महानगर जिल्ह्यातील ग्रामीण मंडळ अध्यक्षा सुषमा खरात, सखुबाई पनबीसरे, दिपाली बीनीवाले, नीलावती धावणे, विशाखा नाईक, सुरेखा बोटुळे, वैशाली बनसोडे, वंदना ढगे, ममता कोंड्याल, वर्षा ठाकूर, स्नेहा जोशी, विद्याताई कुलकर्णी, सुनंदा बदनापूरकर, शितल तनपुरे, पुष्पा मेहेत्रे, अरुणा फुलमाम्बडीकर, मंदा पवार आदींसह महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.यावेळी युवा नेते अक्षय भैया गोरंटयाल, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, महेश निकम, संजय डोंगरे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, वसंत शिंदे, देविदास देशमुख, गोवर्धन कोल्हे, सिद्धिविनायक मुळे, ॲड. अर्जुन राऊत, गजानन खरात, गणेश वाघमारे, गौरव गोधेकर, रोहित नलावडे, गुलाब पणबिसरे आदींसह उपस्थिती होती.

# भारतीय हॉकीचे सुवर्णयुग पुन्हा अवतरेल!

भारतीय पुरुष हॉकी संघाने दक्षिण कोरियासारख्या मात्तबर प्रतिस्पर्धी संघाला ४- १ अशा गोल फरकाने मात देत आशिया चषकावर नाव कोरत इतिहास घडवला. बिहारच्या राजगिर येथे नुकतीच आशिया चषक हॉकी स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत आशिया खंडातील अनेक दिग्गज देश सहभागी झाले होते. आशिया चषक सारख्या महत्वाची स्पर्धा जिंकून भारताने हॉकी मधील आपले श्रेष्ठत्व पुन्हा एकदा सिद्ध केले. याआधीही भारताने पॅरिस आणि टोकियो ऑलिंपिकमध्ये कांस्यपदक जिंकले होते होते. सलग दोन ऑलिंपिकमध्ये भारताने कांस्यपदक जिंकण्याची कामगिरी केली त्यापाठोपाठ आता आशिया चषकही जिंकण्याची करमत करून भारतीय संघाने इतिहास घडवला. ही स्पर्धा जिंकून भारताने २०२६ साली होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेतील आपले स्थान पक्के केले. संपूर्ण स्पर्धेत भारतीय संघाने दर्जेदार खेळ करत प्रतिस्पर्धी संघाला नामोहरण केले. प्राथमिक आणि सुपर फोर फेरीत भारतच्या सर्वच खेळाडूंनी जीव तोडून खेळ केल्याने भारताला अंतिम फेरी गाठणे सुलभ झाले. अंतिम फेरीत तर भारताने कमाल केली. समोर दक्षिण कोरिया सारखा बलवान संघ असतानाही भारतीय खेळाडूंनी आपला आक्रमक खेळ करत दक्षिण कोरियाचा ४- १ असा धुव्वा उडवला.

अंतिम सामन्यात भारतीय संघाने पहिल्या मिनिटापासून आक्रमक खेळ केला. पहिल्या मिनिटातच भारतीय संघाने पहिला गोल केला. भारताच्या सुखजीत सिंगने हा गोल केला. दिलप्रीत सिंगने २८ व्या मिनिटाला दुसरा गोल केला त्यानेच ४८ व्या मिनिटाला दुसरा गोल केला. अमित रोहिदासने आणखी दोनच मिनिटाने म्हणजे ५० व्या मिनिटाला चौथा गोल केला. दक्षिण कोरियाने प्रतिआक्रमण करण्याचा प्रयत्न केला परंतु भारताची बचाव फळी भेदण्यात त्यांना अपयश आले. या संपूर्ण सामन्यात भारताच्या हॉकी संघाने दर्जेदार खेळ केला त्यामुळेच या स्पर्धेत भारत अंजिक्य ठरला विशेष म्हणजे भारताने तब्बल आठ वर्षानंतर दक्षिण कोरियावर विजय मिळवला.

हॉकी हा भारताचा राष्ट्रीय खेळ आहे. एकेकाळी भारतीय हॉकीचा जगभर दबदबा होता. भारतीय संघाने ऑलिंपिक तर अक्षरशः गाजवून सोडली होती. भारताला सर्वाधिक पदके हॉकी या खेळानेच दिली आहेत. ऑलिम्पिकमध्ये भारताने एकूण १३ पदके जिंकली आहेत. यापैकी ८ सुवर्णपदके, १ रौप्यपदक व ४ कांस्यपदकांचा समावेश आहे. असा विक्रम करणारा भारतीय संघ जगातील एकमेव संघ आहे.

गेल्या काही दशकात भारतीय हॉकीला उतरती कळा लागली एकेकाळी जगावर अधिराज्य गाजवणारा भारतीय हॉकी संघ सर्व महत्वाच्या स्पर्धांमध्ये अपयशी ठरू लागला. प्रेक्षकांचाही हॉकी खेळातील रस कमी होऊ लागला. ऑलिंपिकमध्ये पदक मिळवणे हे आपल्यासाठी स्वप्नच ठरले. १९८० मॉस्को ऑलिंपिकमध्ये भारताने कांस्यपदक जिंकले होते त्यानंतर थेट २०२१ मध्ये टोकियो ऑलिंपिकमध्ये पदक मिळवले. मधल्या काळात भारतीय संघ ऑलिंपिकमध्ये फक्त हजेरी लावून येत होता. अनेकदा भारताचा क्रमांक शेवटून पहिला असायचा आता मात्र परिस्थिती बदलली आहे. सलग दोन ऑलिंपिक मध्ये कांस्यपदक आणि आता आशिया चषक स्पर्धेत विजेतेपद मिळवून भारतीय हॉकी संघाने भारतीय हॉकी संघाचे सुवर्ण युग परतत असल्याचे संकेत दिले आहे. भारतीय हॉकी साठी हे शुभ चिन्ह आहे. या विजयाने भारतीय हॉकी खेळाला पुन्हा ऊर्जितावस्था मिळेल. या विजेतेपदामुळे देशातील तरुण मुले हॉकी खेळाकडे वळतील. प्रेक्षकही हॉकीवर पूर्वीप्रमाणे प्रेम करतील. भारतीय हॉकीला पुन्हा अच्छे दिन येतील. भारतीय हॉकीचे सुवर्णयुग पुन्हा अवतरेल. आशिया चषक स्पर्धेतील हे विजेतेपद भारतीय हॉकीच्या सुवर्णयुगाची नांदी ठरेल, यात शंका नाही. आशिया चषक विजेत्या भारतीय हॉकी संघाचे मनापासून अभिनंदन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# राष्ट्रीय पालक विश्रांती दिन : पालकांच्या त्यागाला विश्रांतीचा सन्मान

मानवजातीच्या उत्क्रांतीत कुटुंबसंस्था ही सर्वात प्राचीन, शाश्वत आणि मूलभूत संस्था मानली जाते. समाजशास्त्रज्ञांच्या मते कुटुंब हेच समाजाचे मूलभूत एकक आहे, ज्यातून संस्कृती, परंपरा, सामाजिक मूल्ये, आचार-विचार आणि भावनिक बंध तयार होतात. समाजाचे शिस्तबद्ध आणि सुसंस्कृत अस्तित्व टिकवून ठेवण्यामागे कुटुंबाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून या कुटुंबसंस्थेचे प्रमुख स्तंभ म्हणजे पालक आहेत.

आई-वडील हे केवळ मुलांना जन्म देणारे नसतात, तर ते त्यांच्या आयुष्याचे पहिले शिल्पकार असतात. आई-वडील हेच मुलांच्या संगोपनाचे, संस्कारांचे आणि सुरक्षिततेचे प्राथमिक आधारस्तंभ आहेत. मुलांच्या संगोपनात, शिक्षणात, संस्कारांत, करिअरच्या प्रवासात, विवाह व स्थैर्य मिळविण्यात पालक सतत मुलांच्या पाठीशी उभे राहतात. त्यांचा त्याग, कष्ट आणि समर्पण अमूल्य असते. त्यांच्या अथक परिश्रमामुळे मुलांमध्ये चारित्र्य, जबाबदारीची जाणीव, संस्कृतीची परंपरा आणि समाजाशी जोडलेले मूल्य विकसित होतात. मात्र, या अखंड प्रयत्नांच्या प्रवास प्रक्रियेत पालक अनेकदा स्वतःचा त्याग करतात, आपली स्वप्ने बाजूला ठेवतात, स्वतःच्या आयुष्याकडे, आरोग्याकडे, विश्रांतीकडे दुर्लक्ष करतात आणि आयुष्याचा मोठा भाग कुटुंबासाठी समर्पित करतात. म्हणूनच पालकांच्या या त्यागाची जाणीव करून देत त्यांच्या आरोग्याला, मानसिक समाधानाला आणि सामाजिक योगदानाला सन्मान देण्यासाठी 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' ही संकल्पना समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विशेष महत्त्वाची ठरते.

समाजशास्त्रीय दृष्टीने विश्रांतीचे महत्त्व अधोरेखित केले गेले आहे. विश्रांती म्हणजे फक्त शारीरिक आराम नव्हे, तर मानसिक शांतता, आत्मपरीक्षणाची संधी, निसर्गाशी संवाद, छंद जोपासणे आणि भावनिक ऊर्जेचा पुनर्भरण हा त्याचा व्यापक अर्थ आहे. पालकांच्या आयुष्यातील दैनंदिन जबाबदाऱ्या इतक्या प्रखर असतात की त्यांना हे अनुभवायला वेळ मिळत नाही. परिणामी अनेकदा त्यांचे आरोग्य बिघडते, मानसिक तणाव वाढतो, कौटुंबिक नात्यांमध्ये तणाव निर्माण होतो. अशा वेळी जर समाजाने पालकांना विश्रांतीचा दिवस दिला, तर तो त्यांच्यासाठी नव्या ऊर्जेचा श्वास ठरेल. समाजामध्ये प्रत्येक व्यक्ती काही सामाजिक भूमिका पार पाडत असतो. पालकत्व ही अशी भूमिका आहे जी इतर सर्व भूमिकांपेक्षा अधिक व्यापक, गुंतागुंतीची आणि आजीवन असते. जन्मापासून ते प्रौढत्वापर्यंत मुलांच्या प्रत्येक टप्प्यावर पालकांची नवी जबाबदारी निर्माण होत राहते. मुलांचे शिक्षण, संस्कार, सुरक्षितता, रोजगारासाठीचे मार्गदर्शन, विवाह, सामाजिक प्रतिष्ठा या सर्व टप्प्यांवर पालकांचे श्रम सतत गुंतलेले असतात. या श्रमांमध्ये विश्रांतीसाठी जागा अनेकदा राहत नाही. त्यामुळे 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' हा पालकांच्या भूमिकेला सामाजिक मान्यता देणारा आणि त्यांच्या थकव्याला समजून घेणारा एक महत्त्वाचा उपक्रम आहे.

आधुनिक जगात पालकांवर येणाऱ्या जबाबदाऱ्यांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. शहरी जीवनशैलीत सकाळपासून रात्रीपर्यंतच्या धकाधकीत नोकरी, वाहतूक कोंडी, घरगुती कामे, मुलांच्या अभ्यासाची काळजी, आर्थिक नियोजन आणि सामाजिक जबाबदाऱ्या यामुळे पालकांच्या अंगावर दुप्पट ताण येतो. ग्रामीण भागात शेतीतील अनिश्चितता, हवामान बदल, कर्जबाजारीपणा, बेरोजगारी आणि पारंपरिक सामाजिक अपेक्षा या कारणांनी पालकांची झुंज अखंड सुरू असते.

अशा परिस्थितीत पालकांना एक दिवस जाणीवपूर्वक विश्रांती देणे म्हणजे त्यांच्या आरोग्याला आणि मानसिक शांतीला नवा श्वास देणे होय. एक दिवस पालकांना दिलेली विश्रांती ही कुटुंबातील परस्पर सहयोगाची निशाणी आहे. मुलांनी एका दिवसासाठी पालकांची कामे आपल्या अंगावर घेतली, तर त्यांना पालकांच्या कष्टांची खरी जाणीव होईल. हे केवळ घरापुरते मर्यादित राहत नाही, तर समाजातील एकात्मतेलाही बळकटी देते. यामुळे पालकांबद्दल आदर, कृतज्ञता आणि जबाबदारीची भावना मुलांच्या मनात अधिक दृढ होते. परिणामी, कुटुंबातील बंध अधिक घट्ट होतात आणि समाजातील परस्पर समन्वयही दृढ होतो. सतत श्रम करणाऱ्या व्यक्तीला आपल्या कार्याचे महत्त्व उमजेनासे होते आणि त्याला स्वतःपासून व समाजापासून वेगळे वाटू लागते. पालकांचे श्रमदेखील अनेकदा अदृश्य श्रम असतात.

आईच्या घरगुती कामांना पगार नसतो, तर वडिलांच्या कष्टांनाही अनेकदा केवळ 'कर्तव्य' म्हणून पाहिले जाते. अशा परिस्थितीत 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' पालकांच्या अदृश्य श्रमांना मान्यता देतो, त्यांचा सन्मान करतो आणि त्यांना त्यांच्या सामाजिक योगदानाची जाणीव करून देतो.

आरोग्याच्या दृष्टीने हा दिवस अत्यंत उपयुक्त आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, ताण, चिंता, नैराश्य, हृदयरोग यांसारख्या समस्या पालकांमध्ये वाढत आहेत. यामागे सततची जबाबदारी, आर्थिक ओझे आणि विश्रांतीचा अभाव ही प्रमुख कारणे आहेत. पालकांचे आरोग्य बिघडल्यास त्याचा परिणाम थेट मुलांच्या विकासावर व कुटुंबाच्या स्थैर्यावर होतो. त्यामुळे पालकांना विश्रांती देणे म्हणजे कुटुंबाच्या आरोग्याचे व समाजाच्या भविष्यातील सुरक्षिततेचे रक्षण करणे आहे.

लिंगभावसमतेच्या दृष्टिकोनातूनही या दिवसाचे महत्त्व मोठे आहे. भारतीय समाजात अजूनही आईवर घरकाम, मुलांचे संगोपन, वृद्धांची सेवा अशा जबाबदाऱ्यांचा डोंगर असतो. वडील घराबाहेर कष्ट करून आर्थिक भार पेलतात. या दोन्ही भूमिकांचा सन्मान करणे आणि विश्रांतीद्वारे त्यांना समान आधार देणे ही गरज आहे. 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' या संकल्पनेतून घरगुती कामांचे वाटप, जबाबदाऱ्यांचा समतोल आणि परस्पर सहकार्याची जाणीव वाढीस लागते. यामुळे लिंगभावभेद कमी होतो आणि समतेच्या मूल्यांना बळकटी मिळते.

तंत्रज्ञानाच्या वेगवान युगात मुलांची जगाकडे पाहण्याची दृष्टी बदलली आहे. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया यांत गुंतलेल्या मुलांना पालकांच्या त्यागाची खरी जाणीव होत नाही. या पार्श्वभूमीवर अशा दिवसांचे महत्त्व अधिक वाढते. मुलांनी पालकांसाठी स्वयंपाक करणे, घराची साफसफाई करणे, त्यांच्या छंदांमध्ये वेळ घालवणे किंवा फक्त त्यांच्यासोबत संवाद साधणे यामुळे पालकांना मानसिक समाधान मिळते आणि मुलांमध्ये जबाबदारीची जाणीवही दृढ होते. या दिवसाचे औपचारिकतेत रूपांतर न होता तो खऱ्या अर्थाने सामाजिक चळवळ होण्यासाठी शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि माध्यमे यांनी पुढाकार घ्यायला हवा. शाळांमध्ये पालकांविषयी कृतज्ञतेची निबंध स्पर्धा, वादविवाद, नाटिका यांचे आयोजन करता येईल. स्वयंसेवी संस्थांनी पालकांचा सन्मान करणारे कार्यक्रम घ्यावेत. माध्यमांनी पालकांच्या संघर्षांच्या प्रेरणादायी कथा समाजापर्यंत पोहोचवाव्यात. यामुळे समाजात पालकांविषयी आदराची जाणीव वाढेल आणि 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' एक व्यापक चळवळ बनेल. समाजशास्त्रज्ञांच्या मते, कुटुंबसंस्था ही समाजाच्या प्रगतीची पायाभूत रचना आहे. पालक हे त्या रचनेचे प्रमुख स्तंभ आहेत. त्यांना विश्रांती देणे म्हणजे या स्तंभांना बळकट करणे आणि समाजाच्या भविष्यासाठी मजबूत पाया घालणे होय. म्हणून 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' हा दिवस केवळ एक उत्सव नाही, तर पालकत्वाचा गौरव करणारा, मूल्यांचा पुनर्विचार घडवणारा आणि सामाजिक ऐक्याला बळकट करणारा उपक्रम आहे.

आजच्या वेगवान जीवनात पालकांना स्वतःसाठी वेळ काढणे फार कठीण झाले आहे. ते मुलांच्या भविष्यासाठी झटत असतात, स्वतःच्या इच्छा-आकांक्षा अनेकदा बाजूला ठेवतात. त्यामुळे त्यांना एक दिवसाची विश्रांती देणे ही केवळ कौटुंबिक नव्हे, तर सामाजिक जबाबदारी आहे. पालकांचे समाधान, त्यांचे आरोग्य आणि आनंद यातूनच मुलांचे सुरक्षित बालपण, कुटुंबातील ऐक्य आणि समाजाची प्रगती घडते. म्हणूनच 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' हा दिवस पालकांच्या त्यागाचा सन्मान करणारा, कुटुंबसंस्थेचा उत्सव साजरा करणारा आणि भावी पिढ्यांना कृतज्ञतेचा अमूल्य धडा शिकवणारा ठरतो.

**-डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्र आणि वृद्धत्त्वशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# समाजाच्या शेवटच्या घटकाच्या विकासासाठी प्रसारमाध्यमांची साथ आवश्यक- सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** सामाजिक न्याय विभाग हा समाजातील तळागाळातील घटकांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेला शासनाचा महत्त्वाचा विभाग आहे. या विभागाने हाती घेतलेल्या समाज हिताच्या विविध योजना आणि उपक्रम समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रसारमाध्यमांची साथ अत्यावश्यक असल्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले.

समाज कल्याणासाठी योगदान देणाऱ्या पत्रकारांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी यावेळी जाहीर केले.

राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीच्या दोनदिवसीय बैठकीचे उद्घाटन आज पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे होते. यावेळी आमदार प्रशांत बंब, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी, माहिती व जनसंपर्क संचालक (वृत्त - जनसंपर्क) तथा समितीचे सदस्य सचिव किशोर गांगुर्डे, राज्य समितीचे सदस्य आणि विभागीय माहिती उपसंचालक उपस्थित होते.

लोकशाहीमध्ये प्रसारमाध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. चांगले काम जनतेपर्यंत पोहोचवणे आणि चुकीच्या गोष्टींना आरसा दाखवणे, हे काम प्रसारमाध्यमे करतात. सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने अनेक चांगले उपक्रम हाती घेतले आहेत. या विभागामार्फत राज्यात नवीन १२० वसतिगृहे उभारण्याचे प्रयत्न सुरू असून, आतापर्यंत ४८ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना सकस आहार मिळावा यासाठी पावले उचलण्यात येत आहेत.

## राज्यस्तरीय वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीच्या बैठकीचे उद्घाटन

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने पत्रकारांना सन्मानित करण्याचा निर्णय लवकरच

समाजातील विषमतेची दरी कमी करून सामाजिक सलोखा निर्माण व्हावा, यासाठी अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांना इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांसोबत एकत्रित प्रवेश देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यामुळे विद्यार्थीदशेपासूनच सामाजिक ऐक्याची भावना निर्माण होईल, असा उद्देश असल्याचे पालकमंत्री श्री. शिरसाट यांनी सांगितले.

सामाजिक न्याय विभागामार्फत समाजकल्याणासाठी सकारात्मक बदल घडविण्यासाठी पावले उचलली जात आहेत. योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि वंचित घटकांच्या विकासाला गती देण्यासाठी प्रसारमाध्यमांनी सकारात्मक साथ द्यावी, असे आवाहन पालकमंत्री शिरसाट यांनी केले. समाज कल्याण क्षेत्रात, विशेषतः अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांच्या विकासासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित केले जाते. यापुढे या क्षेत्रात काम करणाऱ्या पत्रकारांनाही या पुरस्काराने गौरवण्याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

### योजनांच्या अंमलबजावणीत प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची- मंत्री अतुल सावे





लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ अशी प्रसारमाध्यमांची ओळख आहे. आजही समाजाला दिशा देण्याचे आणि शासनाच्या योजनांची माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य प्रसारमाध्यमे करतात. योजनांबाबत जनतेच्या प्रतिक्रिया मांडणे आणि आवश्यक बदल सुचवणे यातही प्रसारमाध्यमांची भूमिका मोलाची आहे. त्यामुळे शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत प्रसारमाध्यमांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे यांनी सांगितले. इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत त्यांनी माहिती दिली.

### सामाजिक न्याय विभागाच्या योजनांच्या अंमलबजावणीत पत्रकारांचा सहभाग घ्यावा- यदु जोशी

सामाजिक न्याय आणि इतर मागास बहुजन कल्याण विभाग समाजातील मोठ्या घटकांच्या कल्याणासाठी कार्यरत आहेत. शासनाच्या प्रतिमानिर्मितीत या विभागांची भूमिका महत्त्वाची आहे.

त्यामुळे या विभागांच्या योजनांची प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. यासाठी विभागीय स्तरावर स्वतंत्र समिती स्थापन करून त्यात पत्रकारांचा सहभाग घेतल्यास योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी होईल, असे महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी यांनी सांगितले. तसेच, अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांच्या कल्याणासाठी योगदान देणाऱ्या पत्रकारांना दरवर्षी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. प्रसारमाध्यमांमुळे लोकशाही बळकट झाली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात तंत्रज्ञानाचे चांगले बदल तसेच काही दुष्परिणामही दिसत आहेत.

याबाबत प्रसारमाध्यमांनी समाजाला मार्गदर्शन करून येणाऱ्या आव्हानांची जाणीव करून द्यावी, असे मत आमदार प्रशांत बंब यांनी व्यक्त केले.प्रसारमाध्यमांमुळे प्रशासकीय कामकाजात सकारात्मक बदल घडतात, असे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी नमूद केले. तसेच, हुंडाबळी, बालविवाह, गर्भलिंग निदान आणि स्त्री-भ्रूण हत्या यासारख्या चुकीच्या प्रथांना आळा घालण्यासाठी प्रसारमाध्यमांनी पुढाकार घेऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

प्रारंभी माहिती व जनसंपर्क विभागाचे संचालक किशोर गांगुर्डे यांनी प्रास्ताविकात बैठकीच्या आयोजनाची भूमिका विशद केली आणि पत्रकारांना देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत माहिती दिली. छत्रपती संभाजीनगर विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष डॉ. माधव सावरगावे यांनी उपस्थितांचे आभार मानले. सूत्रसंचालन जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी केले.

# प्रेरणादायी व्याख्याते प्राध्यापक मनोज मोकासे यांना नॅशनल आयकॉन अवॉर्ड २०२५ पुरस्काराने सन्मानित

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड / प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील पिशोर येथील मनोज मोकासे यांना शिक्षक दिना निमित्त मलकापूर जिल्हा बुलढाणा येथे नॅशनल आयकॉन अवॉड २०२५ संपन्न झाला.पिशोर येथील महात्मा ज्योतिबा फुले कला व विज्ञान महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापक प्रेरणादायी व्याख्याते यांनी शिवाजी महाराज संभाजी महाराज महात्मा फुले सावित्रीबाई फुले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे राजमाता





जिजाऊ माता रमाई पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर राजश्री शाहू महाराज अशा महान महामानवाचे विचार व कार्य समाजात व विविध विद्यालय महाविद्यालयात आपल्या व्याख्यानातून करून समाज जागृती केली आहे तसेच गरीब विद्यार्थ्यांना गणवेश वाटप आजारी व्यक्तींना आर्थिक मदत दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन केले आहे त्यांच्या या कार्याला प्रोत्साहन मिळावे म्हणून त्यांना शिक्षक दिन व हिंदी मराठी राष्ट्रीय पत्रकार संघाच्या वतीने मलकापूर जिल्हा बुलढाणा येथे नॅशनल आयकॉन अवॉर्ड २०२५ या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केले महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा सत्कार सोहळ्यांच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर अनिल खरचे प्राचार्य व्ही बी कोलते इंजीनियरिंग कॉलेज महाराष्ट्र प्रदेशाअध्यक्ष हिंदी मराठी पत्रकार संघाच्या धनश्री ताई पाटील उद्योजक दामोदर शर्मा एडवोकेट सम्यक चौरे शेतकरी नेते विजयकुमार डांगा वाहतूक नियंत्रक डॉक्टर प्रदीप गायकी नांदुरा पिशोर चे माजी सरपंच पीएम डाहके एडी सी बँकेचे शाखा अधिकारी बळीराम मोकासे महात्मा फुले शिक्षक सोसायटीचे कर्मचारी साळूबा मोकासे राजू जाधव इत्यादी मान्यवर व अधिक संख्येने माता भगिनी व सत्कारमूर्ती उपस्थित होते सर्व परीसरात त्यांचे कौतुक होत आहेत.

# जय कालंका देवी शिक्षण संस्थेमध्ये तालुकास्तरीय कुस्ती व योगासन स्पर्धा उत्साहात पार

**आत्ताच एक्सप्रेस**

**सावळदबारा / प्रतिनिधी** / जय कालंका देवी शिक्षण संस्था संचालित शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सावळदबारा येथे तालुकास्तरीय कुस्ती व योगासन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धांचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष भाऊराव कोलते यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्राचार्य नारायण कोलते, व शिक्षक, विद्यार्थी. ग्रामस्थ उपस्थित होते.



पंच म्हणून डॉ. जयराम घोती, विजयसिंग राजपूत, सुदाम राठोड, भास्कर खमाट यांनी काम पाहिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जीवन कोलते यांनी केले.





# प्रतिष्ठान महाविद्यालयात जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण सोसायटीचा जनजागृती कार्यक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**

**पिपंळवाडी /प्रतिनिधि/ हारुन,शेख/** पैठण येथील प्रतिष्ठान महाविद्यालयातील एनएसएस विभागात दि.(९) रोजी जिल्हा महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी मुंबई यांच्या सौजन्याने जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. बबलू गायकवाड सर यांनी महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनींना एड्स या रोगांविषयी जनमानसात असलेले समज व गैरसमज या विषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले.

यावेळी एनएसएस कार्यक्रमाधिकारी डॉ. विजय कुमार वैराटे,डॉ.सुभाष राठोड, डॉ. महानंदा राऊत,डॉ. योगिता पगारे,राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक विशाल बारे, साक्षी ससाने,अनुष्का,गणेश तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनीची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# लासुर स्टेशन येथे जिल्हा परिषद शाळेत सावंगी ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने विद्यार्थ्यांची बालसभा व विषेश ग्रामसभा संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/ फिरोज मन्सुरी/** गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन येथील जिल्हा परिषद शाळेत बाल सभा व विषेश ग्रामसभा घेण्यात आली दरम्यान ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणुन प्रामुख्याने काम करणाऱ्या ग्रामपंचायतीस, कामगिरीनुसार प्रोत्साहित करुन त्यांची कार्यक्षमता वाढविण्याकरीता, उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासुन तालुका, जिल्हा, महसुल विभाग व राज्य अशा स्तरांवर प्रोत्साहन देण्याकरीता मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. अभियानाचा कालावधी हा दि. १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ असा आहे. मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य, जिल्हा, तालुका आणि ग्रामस्तरावर संबधित अधिकारी, पदाधिकारी यांच्या करीता प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते दरम्यान मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे अभियान १७ सप्टेंबर ३१ डिसेंबर ह्या या कालावधीत महाराष्ट्रातील बऱ्याच ग्रामपंचायत मध्ये राबवल्या जाणार आहेत त्या अभियानाची जनजागृती म्हणून आज जिल्हा परिषद शाळा लासुर स्टेशन ह्या ठिकाणी ग्रुप ग्रामपंचायत च्या सरपंच मीनाताई संजय पांडव यांच्या अध्यक्षतेखाली बाल सभा विद्यार्थ्यांची घेण्यात आली ह्या बाल सभेमध्ये विद्यार्थ्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले तसेच हे अभियान आपल्या गावामध्ये यशस्वी होण्यासाठी आम्ही पण सहभाग घेऊ असेही विद्यार्थी मित्रांनी सांगितले यावेळी ग्रामपंचायत ग्रामविकास अधिकारी जी आर गायकवाड व ग्रामपंचायत सदस्य



नारायण वाकळे. कल्याण पवार. सोपान बोरकर. प्रकाश कोकरे. अमोल शिरसाट. हे उपस्थित होते तर काही ग्रामपंचायत सदस्य यांची अनुपस्थित होती ..ग्रामस्थ संदीप गायकवाड संचालक सुनील पाखरे कचरू भाले बाळासाहेब थोरात कडू शेलार छोटू पठाण अम्मू शेख गावातील नागरिक आशाताई अंगणवाडी सेविका शिक्षक विद्यार्थी गावकरीसह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दक्षिण मध्य रेल्वेमार्फत दिवाळी, छठ व दसरा सणांच्या पार्श्वभूमीवर नांदेड - तिरुचानूर - नांदेड विशेष गाड्या

**आत्ताच एक्सप्रेस**

**छ.संभाजीनगर /प्रतिनिधि/** सणासुदीच्या काळात प्रवाशांच्या वाढत्या गर्दीची सोय करण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाकडून नांदेड - तिरुचानूर - नांदेड या दरम्यान विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या गाड्या विशेष भाडे (साधारण भाड्याच्या १.३ पट) दराने धावतील. गाड्यांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे : गाडी क्रमांक ०७०३९ नांदेड - तिरुचानूर विशेष गाडी दिनांक १६ सप्टेंबर २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत दर मंगळवार नांदेड येथून सायंकाळी १६.५० वाजता सुटेल आणि मुदखेड, बासर, निझामाबाद, अर्मुर, लिंगमपेट जगतीयाल, करीमनगर, पेद्दपल्ली, जमिकुंता, वरंगल, मह्बुबाबाद, दोर्णकाल, खम्मम, मधीरा, विजयवाडा, तेनाली, चीराला, ओंगोल, नेल्लोर, रेणीगुंठा मार्गे तीरुचानुर येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ११.३० वाजता पोहोचेल. हि गाडी एकूण तीन फेऱ्या पूर्ण करेन. गाडी क्रमांक ०७०४० तिरुचानूर - नांदेड विशेष दिनांक १७ सप्टेंबर २०२५ ते ०१ ऑक्टोबर २०२५ दर बुधवार तीरुचानुर येथून सायंकाळी १८.४० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच हुजूर साहिब नांदेड येथे दुसऱ्या दिवशी सायंकाळी १६.०० वाजता पोहोचेल. हि गाडी तीन फेऱ्या पूर्ण करेल.या गाडीत स्लीपर, वातानुकुलीन आणि जनरल असे एकूण २२ डब्बे असतील. प्रवाशांनी या विशेष गाड्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# अनिल विश्वनाथराव वायकोस यांचे निधन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी /** चौराहा येथील रहिवासी अनिल विश्वनाथराव वायकोस (वय ५७) यांचे दि.१२ सप्टेंबर रोजी सकाळी ९.४५ वाजता आजाराने निधन झाले. त्यांच्यावर दि. १२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता कैलास नगर स्मशानभूमीत अत्यंसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, भाऊ, बहिणी असा परिवार आहे.



# वीजपुरवठा परस्पर जोडणे पडले महागात; जालन्यात ३० जणांवर पोलिसांत गुन्हा दाखल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी/** वीजबिलाच्या थकबाकीसाठी महावितरणने वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित केलेला असतानाही तो परस्पर जोडून घेणे ३० ग्राहकांच्या चांगलेच अंगलट आले आहे.

या सर्वांवर वीजचोरी तसेच महावितरणच्या यंत्रणेशी छेडछाड केल्याप्रकरणी थेट पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. महावितरणच्या या धडक कारवाईमुळे वीजचोरांमध्ये खळबळ उडाली आहे. यापूर्वी अशा प्रकरणांत जिल्ह्यात १६ गुन्हे दाखल झालेले आहेत.भोकरदन ग्रामीण शाखेचे कनिष्ठ अभियंता प्रदीप सातदिवे यांनी सहकाऱ्यांसह तडेगावात तपासणी मोहीम राबवली. गावातील गुलाब सुखदेव जाधव, कमलबाई रामभाऊ नाईक, शेख सत्तार शेख अजीज, शेख गफ्फार शेख आजीस, बाबुराव धर्माजी साळवे व हरिबा एकनाथ पन्हाळे या ग्राहकांनी ४६ हजार २५४ रुपयांचे वीजबिल न भरल्यामुळे त्यांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी बंद करण्यात आलेला होता. त्यानंतरही त्यांनी अज्ञात इसमाच्या साह्याने लघुदाब वाहिनीला छेडछाड केली आणि आकडे टाकून विजेचा अनधिकृतपणे वापर केला. या ग्राहकांनी महावितरणचे ६० हजार ५१० रुपयांचे आर्थिक नुकसान केले. त्यांना जोडभारानुसार १२ हजार रुपये तडजोड शुल्कही आकारण्यात आले.

राजूर शाखेचे सहायक अभियंता आदित्य खंडीझोड यांनी सहकाऱ्यांसह तपोवन गावात तपासणी मोहीम राबवली. गावातील रमेश रंगनाथ बोर्डे, संगीताबाई सोनाजी पवार, लिंबाजी माधवराव बोर्डे, विमलबाई सुखदेव पवार, दयानंद रघु पवार, अंबादास धोंडीबा पवार व सुदाम दगडुबा पवार या ग्राहकांनी ६० हजार ५४६ रुपयांचे वीजबिल न भरल्यामुळे त्यांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी बंद करण्यात आलेला होता. त्यानंतरही त्यांनी अज्ञात इसमाच्या साह्याने लघुदाब वाहिनीला छेडछाड केली आणि आकडे टाकून विजेचा अनधिकृतपणे वापर केला. या ग्राहकांनी महावितरणचे ७० हजार ५९० रुपयांचे आर्थिक नुकसान केले. त्यांना जोडभारानुसार १४ हजार रुपये तडजोड शुल्कही आकारण्यात आले.

भोकरदन शहर शाखेचे सहायक अभियंता प्रमोद दारकोंडे यांनी सहकाऱ्यांसह दावतपूर गावात तपासणी मोहीम राबवली. गावातील नंदाबाई दादाराव घायवट, प्रभाकर किसन घायवट, विश्वास त्रिंबक घायवट, अण्णा वामनराव देशपांडे, रमेश नामदेव घायवट, शंकर कृष्णा घायवट, अशोक फकीर घायवट व रुबिंद्र नारायण घायवट या ग्राहकांनी १ लाख ८० हजार ८६६ रुपयांचे वीजबिल न भरल्यामुळे त्यांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी बंद करण्यात आलेला होता त्यानंतरही त्यांनी अज्ञात इसमाच्या साह्याने लघुदाब वाहिनीला छेडछाड केली आणि आकडे टाकून विजेचा अनधिकृतपणे वापर केला. या ग्राहकांनी महावितरणचे ५९ हजार ६५० रुपयांचे आर्थिक नुकसान केले. त्यांना जोडभारानुसार १६ हजार रुपये तडजोड शुल्कही आकारण्यात आले.

हसनाबाद शाखेचे कनिष्ठ अभियंता मयूर बुलगे यांनी सहकाऱ्यांसह जानेफळ मिसाळ गावात तपासणी मोहीम राबवली. गावातील भागुबाई जगनाथ मिसाळ, गंभीरराव संतुकराव मिसाळ, कृष्णा बालाजी कांबळे, लताबाई माणिकराव बनसोडे व सुखदेव यादवराव मिसाळ या ग्राहकांनी ६१ हजार ६५५ रुपयांचे वीजबिल न भरल्यामुळे त्यांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी बंद करण्यात आलेला होता.

त्यानंतरही त्यांनी अज्ञात इसमाच्या साह्याने लघुदाब वाहिनीला छेडछाड केली आणि आकडे टाकून विजेचा अनधिकृतपणे वापर केला. या ग्राहकांनी महावितरणचे ५० हजार ६६० रुपयांचे आर्थिक नुकसान केले. त्यांना जोडभारानुसार १० हजार रुपये तडजोड शुल्कही आकारण्यात आले.

बदनापूर शहर शाखेचे सहायक अभियंता कृष्णा कुलकर्णी यांनी सहकाऱ्यांसह बदनापूरमध्ये तपासणी मोहीम राबवली. गावातील शेख बाबा शेख अकबर, हसनुरबी शेख महेमूद, सायराबी सय्यद बाशीर व शेख तय्यब शेख अहमेदराज या ग्राहकांनी २७ हजार ८५७ रुपयांचे वीजबिल न भरल्यामुळे त्यांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी बंद करण्यात आलेला होता. त्यानंतरही त्यांनी अज्ञात इसमाच्या साह्याने लघुदाब वाहिनीला छेडछाड केली आणि आकडे टाकून विजेचा अनधिकृतपणे वापर केला. या ग्राहकांनी महावितरणचे ३० हजार २८५ रुपयांचे आर्थिक नुकसान केले. त्यांना जोडभारानुसार ८ हजार रुपये तडजोड शुल्कही आकारण्यात आले.

या ३० ग्राहकांकडे वीजबिलांची ३ लाख ७७ हजार रुपयांची थकबाकी असल्याने महावितरणने त्यांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित केलेला होता. त्यानंतरही त्यांन विद्युत यंत्रणेशी छेडछाड केली आणि परस्पर वीज जोडून अनधिकृतपणे वापर केला. त्यांना वीजचोरीची २ लाख ७१ हजार ६९५ रुपयांची निर्धारित बिले देण्यात आली. तसेच ६० हजार रुपयांचे तडजोड शुल्क आकारण्यात आले.

या सर्व आरोपींवर भोकरदन पोलिस ठाणे व जालन्यातील सदर बाजार पोलिस ठाण्यात विद्युत कायद्याच्या कलम १३५ व १३८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वी अशा प्रकरणांत १६ ग्राहकांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. आतापर्यंत जालना जिल्ह्यात परस्पर वीज जोडून वीजचोरी करणाऱ्या ४६ ग्राहकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## संक्षिप्त

### जालन्याची पर्यावरणपूरक शहराच्या दिशेने वाटचाल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** रोटरी क्लब ऑफ जालना आणि महापालिका यांच्या संयुक्त प्रयत्नातून अनेक पर्यावरणपूरक उपक्रम राबविले जात असून, त्याअंतर्गत रोटरीतर्फे एसआरजे स्टील कंपनीच्या सीएसआर फंडातून देऊळगाव राजारोडवरील स्व. बाबुराव काळे चौक ते अग्निशमन दल या मार्गावर भारतीय प्रजातीच्या तीन हजार झाडांची लागवड करण्यात येऊन या ठिकाणी शांती घनवन विकसित करण्यात आले आहे. सोबतच या संपूर्ण परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले असून, त्याचा लोकार्पण सोहळा सोमवार दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते आणि रोटरी डिस्ट्रिक्टचे प्रांतपाल सुधीर लातूरे, महापालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, एस आर जे वर्ल्ड ऑफ़ स्टीलचे संचालक सुरेन्द्र पित्ती यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आल्याची माहिती रोटरीच्या अध्यक्षा वर्षा पित्ती यांनी दिली.



वर्षा पित्ती यांनी सांगितले की, रोटरीच्या ‘शांती सप्ताह’ निमित्त विविध पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अंतर्गत राष्ट्रीय हिंदी विद्यालय क्रीडा संकुलाच्या समोर ‘शांती घनवन’ विकसित करण्यात आले असून भारतीय प्रजातीची तीन हजार झाडे लावण्यात आली आहेत. संवर्धनासाठी संरक्षक जाळ्या, ठिबक सिंचनाची व्यवस्था, रंगरंगोटी, सिमेंट बेंच, सेल्फी पॉईंट आणि विजेची रोषणाई यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. महापालिकेने या झाडांसाठी नियमित पाण्याची सोय केली आहे. सुमारे दोन हजार वर्ग फुट क्षेत्रावर विकसित व हरित विकासाला चालना देणारा ‘शांती घनवन’ हा प्रकल्प शहराच्या सौंदर्य वाढीस आणि पर्यावरण संवर्धनासाठी उपयुक्त ठरणार आहे. नागरिकांसाठी विरंगुळ्याचे तसेच हिरवळीने नटलेले आकर्षक ठिकाण उपलब्ध होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.लोकार्पण सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून या पर्यावरणपूरक उपक्रमाचे साक्षीदार बनावे, असे आवाहन रोटरी क्लबच्या अध्यक्षा वर्षा पित्ती, सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत, प्रकल्प प्रमुख शिवरतन मुंदडा, सुरेश मगरे, हेमंत ठक्कर आणि सामाजिक कार्यकर्ते उदय शिंदे यांनी केले आहे.

### जालना महानगरपालिकेकडुन ३७२ नळ कनेक्शनचे नियमितीकरण २७ लाख १५ हाजार ६०० रुपये वसुल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/** जालना महानगरपालिका - ३७२ नळ कनेक्शनचे नियमितीकरण २७१५६०० रुपये वसुल यापुढे जे आज तडजोडी आले नाही किंवा तडजोड झाली नाही अशा अनधिकृत नळ धारकांना यापुढे १० हजारच भरणा करावा लागेल.

जालना जिल्हा व सत्र न्यायालय येथे तिसऱ्या राष्ट्रीय लोक




अदालत मध्ये जालना शहरातील महानगरपालिकेच्या अनधिकृत धारकांची प्रकरणी तडजोडी करिता सादर करण्यात आली होती. या दरम्यान एकूण ३७२ अनधिकृत नळ कनेक्शन तडजोडी अंती अधिकृत करण्यात आली आहेत. त्याद्वारे महानगरपालिकेने रु. २७,१५,६००/- इतक्या रकमेची वसुली केली आहे.

राष्ट्रीय लोक अदालतीचे उद्घाटन माननीय पालक न्यायाधीश यांच्या हस्ते पार पडले, याप्रसंगी महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक, माननीय जिल्हा व सत्र न्यायाधीश तसेच माननीय न्यायाधीश जिल्हा विधी सेवा प्राधिकरण हे उपस्थित होते.याप्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कर्मचारी व महानगरपालिकेचे कर्मचारी

# आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक निमित्त जालना जिल्हा कांग्रेस कमेटी ची आढावा बैठक संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी/** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक निमित जालना जिल्हा कांग्रेस कमेटीच्या प्रमुख पदाधिकारी यांची जिल्हा आढावा बैठक नवनियुक्त जालना जिल्हा प्रभारी अशोक शिवाजीराव पाटील निलंगेकर व खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत, जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्या अध्यक्षतेत व जालना जिल्ह्यातील पाच विधानसभचे नवनियुक्त निरीक्षक एड. सैयद अकरम, रविंद्र काळे, अशोक डोळस, गणेश राउत , समद पटेल, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, प्रदेश उपाध्यक्ष कल्याण दळे , प्रदेश उपाध्यक्ष बदर चाउस, अनवर बापू देशमुख, अविनाश चव्हाण यांच्या विशेष उपस्थितित मधुर बैंक्वेट हॉल, नवीन जालना येथे संपन्न झाली..नवनियुक्त जालना जिल्ह्याचे प्रभारी श्री. अशोक पाटील निलंगेकर यानी बैठकित आगामी स्थानिक स्वराज्य संस्था डोळ्यासमोर ठेवुन पदाधिकारी यांनी संगठन रचना व बुथ कमेटया बळकटी करण्यास प्राधान्य देणे तसेच पक्षाच्या विचारधारेला तळागाळापर्यंत पोहोचवणे असे आव्हान पदाधिकारी यांना केले.

खासदार मा डॉ कल्याण काळे साहेब यांनी पक्ष संगठन




मजबूतीकरण, प्रभाग निहाय शाखा स्थापना व प्रभाग निहाय बैठका घेण्याच्या सुचना दिल्या व आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत विजय प्राप्तिसाठी खंबीरपने मी आपल्या पाठीशी उभा आहे असे सांगितले. जिल्ह्याध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी आपल्या संबोधनात आगामी स्थानिक संस्था निवडणूक हया पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे भविष्य घडवणाऱ्या आहेत. पदाधिकारी यांनी संगठन रचना व बुथ कमिटया गठित करावे तसेच प्रभाग निहाय शाखा स्थापना कराव्या. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत विजय प्राप्तिसाठी पक्ष संगठन आपल्या पाठीशी खंबीरपने उभा राहिल अशी ग्वाही दिली..

काँग्रेसच्या इतिहासात सर्वात मोठी यात्रा राहुल गांधींनी केली, देशातल्या बहुतांश भागातून ते फिरले यापासुन युवा पदाधिकारी यांनी प्रेरणा घ्यावी व देशाच्या एकता, अखंडता व विकासासाठी पक्ष संगठन बळकटी करणात आपले योगदान द्यावे.

यावेळी राम कुरहाडे, माझी सभापति अब्दुल रऊफ, विजय चौधरी, संजय मुथा, आरिफ शेख,युवा जिलाध्यक्ष राहुल देशमुख, सेवा दलाचे अध्यक्ष इब्राहिम शेख, महिला अध्यक्ष सौ. नंदा पवार, ज्ञानेश्वर भांदरगे, अंकुश रावत, इकबाल कुरैशी, युवा शहराध्यक्ष वसीम शेख, नवाब डांगे , बासित कुरैशी, इरशाद शेख, करीम बिल्डर, कृष्णा पडुल , कलीम खान, अजय बनकर, अब्दुल हमीद, कल्याण तारडे, मोइज अंसारी, लक्ष्मण मसलेकर, इमरान खान, विनोद यादव, श्रीरंग कामटे, आकाश भाऊ, अशोक उबाले, नारायण वाडेकर, सूरज यालगनवार, अमोल भोसले, प्रमोद अल्हाट, विशाल धानुरे, फकीरा वाघ, बद्री उफ़रे, सुभाष कामले, प्रभाकर मामा, प्रल्हाद जाधव, मनोहर उघड़े, मोहम्मद सेठ, अमजद खान, सय्यद अजहर, शेख वसीम, वसीम कुरैशी, सय्यद रहीम तांबोली, आसिफ अंसारी, अरशद शेख, वसीम खान, मजहर सौदागर, अब्दुल रज्जाक, जावेद कुरेशी, युनुस शेख, सचिन कचरे , जावेद बेग, अनस चाउस, गणेश चंदोडे, इरशाद शेख, किसन जेठे, सलीम काजी, मोबिन खान, सोपान तिडख, दिलीपराव चव्हाण, लक्ष्मणराव बोम्बले, जावेद पटेल, डॉ. जगन्नाथ वैराल इरफान सिद्दीकी, त्रिम्बक तिरुखे, सलीम काजी, एजाज पठान, गुड्डू पत्रकार, विश्वास बाघ, रमेश जाधव व माठया संखेने पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांग्रेस कमिटी चे शहराध्यक्ष अतिक खान यांनी केले.

### बालविकास प्राथमिक शाळेत संस्थेच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** कसबा येथील महिला मंडळ जुना जालना संचलित श्रीमती प्रभावतीबाई कोळेश्वर बालविकास प्राथमिक शाळेत शुक्रवार दि. १२ सप्टेंबर रोजी महिला मंडळाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.व्यासपीठावर सत्कारमूर्ती नूतन अध्यक्ष सौ. विद्याताई कुलकर्णी, माजी अध्यक्ष सौ. सीमाताई देशपांडे, उपाध्यक्ष सौ. विजयाताई बागुल, सचिव सौ. सुनंदाताई बदनापूरकर, सहसचिव सौ. सुषमाताई पायगव्हाणे, कोषाध्यक्षा सौ. मीराताई देशपांडे, बालवाडी विभागाच्या चिटणीस सौ. सुलभाताई सीपोरकर, कायदेशीर सल्लागार सौ. सुखदाताई देशपांडे, सदस्य सौ. आशा भाले, सौ.मनीषा कुलकर्णी, सौ. अनुराधा चंद्रात्रे, सौ. श्रद्धा देशपांडे , श्रीमती विजया देशपांडे, सौ. दिपाली देशपांडे, मुख्याध्यापिका सौ. सुजाता परदेशी यांची उपस्थिती होती.

यावेळी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा मुख्याध्यापिका, शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्प व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय समारोपात सौ. विद्याताई कुलकर्णी यांनी आगामी काळात नाविन्यपूर्ण प्रकल्प, शाळेची गुणवत्ता वाढ इत्यादी उपक्रम राबवण्याचा मानस व्यक्त केला. प्रारंभी सहशिक्षिका श्रीमती अंजली पाऊलबुद्धे यांनी शारदा स्तवन तर सहशिक्षिका श्रीमती शुभांगी भुमकर यांनी विद्यार्थिनींसह स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षिका श्रीमती छाया मुधोळकर यांनी, सूत्रसंचालन सहशिक्षक विलास मोहिते यांनी केले तर उपस्थितांचे आभार सहशिक्षक गजानन गिऱ्हे यांनी यांनी मानले.

# छगन भुजबळ यांच्याशी चर्चेची तयारी.!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी/** भुजबळ साहेब मराठा आणि कुणबी व एकंदरच आरक्षण व राजकीय उद्दिष्ट पुर्तूतेसाठी पेटवली जात असलेली सामाजिक विखारी कटुता या संदर्भात एका बाजूचे कडवट सर्वोच्च नेते म्हणून आणि आपल्या लातूर दौऱ्यातील जाहीर आवहनाला सकारात्मक प्रतिसाद देण्यासाठी आम्ही मराठा आणि बहुजन समाजात कार्यरत विविध सामाजिक संघटनेचे सक्रिय पदाधिकारी आपल्याशी चर्चा करण्यासाठी तयार आहोत. चर्चेसाठी वेळ आणि स्थळ आपण तातडीने कळवावे.! असे आवाहन सकळ मराठा समाज आणि मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक आणि अभ्यासक डॉ. संजय लाखेपाटील यांनी ना. छगन भुजबळ यांच्या कालच्या लातूर जिल्हा दौऱ्यावर केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देताना केले असून, पुढे बोलतांना डॉ. संजय लाखेपाटील यांनी राज्यातील मराठा समाजाला आर्थिक मागासासाठीचे ५०% पुढील १०% आरक्षणाचा लाभ सध्या मिळत नाही; घेताच येत नाही (कारण न मागीतलेले एसईबीसी आरक्षण) तसेच देशातील प्रस्थापित कायदा, राष्ट्रीय /राज्य मागासवर्गीय आयोगाचे विविध अहवाल व सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निवाड्यानुसार मराठा व कुणबी (कुणबीमराठा, मराठा कुणबी) या वेगवेगळ्या व स्वतंत्र जाती आहेत याची माहिती आपणास नसावी याबद्दल सखेद आश्चर्य व्यक्त केले आहे!

तसेच देशातील प्रस्थापित कायद्या नुसार कोणत्याही व्यक्तीला ला जातीला किंवा जात समुहाला दोन आरक्षण कायद्याचा लाभ घेता येत नाही; नव्हे तसे दोन कायदे लागूच नसतात याचीही माहिती आपणास नाही हे कालच्या (ना. भुजबळ) यांच्या व्यक्तव्यावरून स्पष्ट झाले असल्यामुळे याबाबत डॉ. लाखेपाटील यांनी गंभीर चिंता व्यक्त केली असून अश्या घटनात्मक, कायदेशीर अज्ञानातूनच्या व्यक्तव्यावरूनच राज्यातील सामाजिक वातावरण गढूळ होत असल्याने जेष्ठ नेते ना. छगनराव भुजबळ यांना योग्य वैधानिक सल्ल्याची गरज असल्याचे आग्रही प्रतिपादन केले आहे. नसता मराठा समाज कुणबी, एसईबीसी, ईडब्लूएस अश्या विविध आरक्षणाचा लाभ मराठा जात घेत आहे असे धांदात खोटे व्यक्तव त्यांनी केलेच नसते असे निदर्शनास आणून देऊन ही वैधानिक वास्तविकता समजून घेण्यासाठी/ समजून सांगण्यासाठी ना. छगन भुजबळ यांच्याशी विशेष चर्चेची तयारीही डॉ. संजय लाखेपाटील यांनी दाखवली आहे आणि त्यांनी किमान ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. बबनराव तायवाडे यांना ओबीसी आरक्षण विषयक वैध तरतुदीचे शासकीय सल्लागार म्हणून मंत्रीमंडळाच्या ओबीसी आरक्षण विषयक उपसमितीने नियुक्त करावे अशी आग्रही विनंती डॉ. संजय लाखेपाटील यांनी केली असून राज्यात मराठा समाजाने न मागितलेले आणि कायद्याच्या, घटनेच्या, सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्यांच्या कसौटीवर न टिकणारे आणि तसे देण्याचा राज्याला वैधानिक अधिकारच नसलेले आणि म्हणूनच मराठा समाजाला नको असलेले ५०% पुढील एसइबीसी आरक्षण कायदा रद्द करण्यासाठी व त्यामुळे आपोआपच लागू होऊ शकणारे आर्थिक मागासासाठीचे ईएसडब्लू आरक्षण तातडीने परत लागू करण्यासाठी ना. छगन भुजबळ यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दोन्ही उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे व ना. अजित पवार यांच्या कडे मध्यस्थी करावी अशीही आग्रही मागणी केली असून, पुढे बोलतांना काही माफक अपेक्षा व्यक्त केल्या असून ना. छगन भुजबळ यांनी श्री. बबनराव तायवाडे यांचा सल्ला घेतल्याशिवाय मराठा व कुणबी जातीच्या स्वतंत्र आरक्षणाबाबत वैधानिक अज्ञानातूनत्या एकच जाती आहेत असा अपप्रचार करू नये; १९६७ च्या कायद्याचे तंतोतंत पालन करून ओबीसी आरक्षण विषयक मंत्रीमंडळाच्या उपसमितीचे अध्यक्ष आणि राज्याचे महसूल मंत्री ना चंद्रशेखर बावनकुळे यांच्या महसूल/प्रशासन यंत्रणेद्वारे कायदेशीर वैधता तपासून दिल्या जात असलेल्या ओबीसी जातसमुहातील क्र ८३ वरील कुणबी जात प्रमाणपत्रांना सामाजिक गैरसमज वाढवून संघर्ष व विरोध करू नये; ओबीसी जातसमुहातील कुणबी जातप्रमाणपत्रासाठी आग्रही आंदोलक नेते श्रीमान मनोज जरांगे आणि आपल्यातील राज्यातील सामाजिक प्रदुषण वाढवून युवकांमध्ये नैराश्य व आत्महत्या प्रवृत्ती वाढवणारा टीआरपीसाठीचा 'डब्लुडब्लूएफ' कलगीतुरा तातडीने थांबवावा आणि राज्यातील निकोप व गंभीर विषयांच्या चर्चेसाठी स्पेस सोडावी अशी आग्रही विनंती केली असून ओपन मधील मराठा जातीला सध्या दिलेले.

परंतु बेकायदेशीर, घटनाबाह्य ५०% पुढचे एसईबीसी आरक्षणाचा कायदा ताबडतोब रद्द करून, मुंबई उच्च न्यायालयाला तसे कळवून संबंधित याचिका राज्य सरकारने परत घ्यावी आणि त्यामुळे राज्यातील खुल्या गटातील मराठा जातीसाठी आर्थिक मागासासाठीचे ईएसडब्लू आरक्षण आपोआप लागू होण्यासाठी मराठा जातीतील राज्यातील आमच्या विविध प्रमुख मराठा सामाजीक संघटना /पदाधिकारी यांच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व करावे आणि या चर्चांसाठी शिष्टमंडळाने आपणास भेटण्यासाठी तातडीने वेळ द्यावा अशीही आग्रही विनंती डॉ. संजय लाखेपाटील यांनी केली असून तशी विनंती त्यांच्या कार्यालयात संबंधित सहायकांनी नोंदवली आहे!

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Mundhe Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (Editor - Sugriv Sopanrao Mundhe) Office Ph. : 0240-2474813